# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं. 131/2024  दिनांक : 10.04.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**किनवट :–** दिनांक 08.04.2024 रोजी चे 21.20 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर साईनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील नमुद तीन आरोपीतांनी संगनमत करून, फिर्यादी महिलेच्या चारीत्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ करून थापड बुक्यांनी मारहाण केली व हातातील धारदार चाकुने दोन्ही हाताचे पोटरीवर, पोटावर, पाठीवर सफासफ वार करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी अफसाना शेख मुल्ला, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. साईनगर किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 96/2024 कलम 307, 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री झाडे, मो.क्रं. 8668842897** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**सोनखेड :–**दिनांक 02.04.2024 रोजी चे 18.30 ते 19.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या दुकानासमोर व कलंबर फाटयाजवळ रोडवर सोनखेड ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने तुझ्या दुकानाचे काय नुकसान झाले असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून थापडा बुक्याने मारहाण करून निघुन गेला. व पुन्हा सायंकाळी साडे सात वाजताचे सुमारास येवुन फिर्यादीस डाव्या डोळयावर बुक्की मारून जखमी केले व गच्चीला धरून त्याच्या कारमध्ये बसवुन कलंबर फाटयाजवळ रोडवर नेले व फिर्यादीस खाली उतरवुन, खाली पाडुन लोखंडी रॉडने फिर्यादीच्या उजव्या पायाच्या गुडघ्यावर मारून गंभीर दुखापत करून फिर्यादीचे हाड मोडले. परत माझ्या नादी लागलास तर जिवे मारून टाकतो अशी धमकी दिली. वगैरे **फिर्यादी गजानन भिमराव मोरे, वय 29 वर्षे, व्यवसाय कापड दुकान रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 65/2024 कलम 326, 324, 323, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2342 हंबर्डे, मो. नं. 9284422052** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 01.01.2024 पासुन ते दिनांक 09.04.2024 चे दरम्यान, **मालीपुरा जामा मज्जिद जवळ जालना ह. मु. मखदुमनगर नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस भंगारचे दुकान टकाण्यासाठी तुझ्या माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन तिचा शारिरीक व मानसीक छळ केला. व फिर्यादीचे भावास जिवे मारण्याची धमकी देवुन तिस घरातुन हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 122/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 शिरसाट, मो.क्रं. 7020510553** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**विमानतळ :–** दिनांक 07.04.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **माळटेकडी फ्रुट मार्केट नांदेड येथे**, यातील **मयत नामे सय्यद जावेद सय्यद मुनाफ, वय 45 वर्षे, रा. मिल्लतनगर इतवारा नांदेड**, यास एका पांढऱ्या रंगाच्या अज्ञात कार चालकाने त्याच्या ताब्यातील कार ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयतास धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. व कार सोडुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी सय्यद सलीम सय्यद मुनाफ, वय 42 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. रहमतनगर शालीमार फंक्शन हॉल जवळ परभणी ता. जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 110/2024 कलम 279, 304(अ) भादवी सह कलम 184 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/भोसले, मो.क्रं. 8390613489** हे करीत आहेत.

## 5)आचारसंहीतेचा भंग :—

**1)लोहा** :—दिनांक 05.04.2024 रोजी चे 13.55 वा. चे सुमारास, **कंधार ते पानभोसी नवघरवाडी रस्त्यावर गावाच्या जवळ पुलाच्या संरक्षक भिंतीवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने आदर्श आचार संहीता लागु असताना विनापरवाना बेकायदेशिररित्या पुलाच्या संरक्षण भिंतीला बहुजनांचे कैवारी सेवा जनशक्ती पार्टीचे प्रमुख लोहा कंधारचे भावी आमदार मा. प्रा. मनोहर धोंडे सर यांना वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा असा मजकुर संरक्षण भिंतीवर नावे टाकलेला दिसुन आला व आदर्श आचार संहितेचा भंग केला. वगैरे **फिर्यादी शिवाजी सिताराम राठोड, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी शाखा अभियंता पंचायत समिती लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 115/2024 कलम 188 भादवि सह कलम 3 महाराष्ट्र मालमत्ता विरूपण प्रतिबंधक 1995 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मस्के, मो.क्रं. 8805011610** हे करीत आहेत.

**2)मांडवी** :—दिनांक 08.04.2024 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **फॉरेस्टनका मौ. उनकेश्वर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने आपले ताब्यातील वाहन क्रमांक एमएच—08/एच—8404 यावर बिना परवाना बेकादेशीररीत्या निवडणुक निर्णय अधिकारी यांची परवाणगी न घेता भाजपा पक्षाचे प्रचार करण्याच्या उद्देशान वाहनावर मोदीची गॅरंटी असे लिहुन व वरिष्ठ नेत्यांचा फोटो लावुन एलईडी स्क्रिन लावुन प्रचार करताना आचारसंहीतेचा भंग करतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी कोंडबा महादु सिडाम, वय 52 वर्षे, व्यवसाय कृषीअधीकारी, रा. किनवट ता. किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरनं 27/2024 कलम 188 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहकॉ/2483 साखरे, मो.क्रं. 9823305483** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)नांदेड ग्रामीण** :—दिनांक 09.04.2024 रोजी 00.20 वा. चे सुमारास, **मधुबन शाळेच्या पाठीमागे मोकळया जागेत धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या लोकांकडुन पैसे घेवुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना त्यांचे ताब्यातुन तीन मोबाईल व एक हिरो कंपणीची स्पलेंडर प्लस काळया रंगाची असा एकुण 62,390/—रू चे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/492, संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 293/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 मुपडे, मो.क्रं. 9822441238** हे करीत आहेत.

**2)सिंदखेड** :—दिनांक 09.04.2024 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **मौ. वाई बाजार येथील यात्रेमध्ये सार्वजनिक जागेत ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या चिडीपकडी नावाचा जुगार खेळत असतांना नगदी 1240/रू व जुगाराचे चे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2471, गजानन रामा कुमरे, ने. पोस्टे सिंदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 32/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2471 कुमरे, मो.क्रं. 9921010100** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**मुक्रामाबाद** :— दिनांक 09.04.2024 रोजी चे 12.45 वा. चे सुमारास, **बुडको पुलाचे खाली बाऱ्हाळी ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभटटीची दारू किंमती 4000/—रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री ताहेर गुलामनबी शेख, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 73/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2605 पवार, मो.नं. 8975766437** हे करीत आहेत.

## 8)विषारी साप चावुन मृत्यु :—

**हिमायतनगर** :—दिनांक 08.04.2024 रोजी चे 02.30 वा. सुमारास, **सरकारी दवाखाना भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे चरणसिंग तुळशिराम चव्हाण, वय 47 वर्षे, रा. पवणतांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड,** हा स्वताचे शेतात ज्वारीला पाणी देत असतांना कोणतातरी विषारी साप चावल्याने त्यास उपचारकामी सरकारी दवाखाना हिमायतनगर येथे दाखल केले असता. डॉक्टरांनी तपासुन मयत घोषीत केले. वगैरे **खबर देणार उदल चरणसिंग चव्हाण, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. पवणातांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. **11**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/श्री बालाजी पाटील, मो.नं. 9765999899** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड